## दिनांक ११.०६.२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समिती सभेचा कार्यवृत्तांत

अमरावती महानगरपालिकेची वृक्ष प्राधिकरण समितीची सभा मा. आयुक्त यांचे कक्षा लगतच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये दिनांक ११.०६.२०२५ रोजी स. ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती सभेस खालील सन्मा. तांत्रिक सदस्य व अधिकारी/कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

मा.अतिरिक्त आयुक्त (१), महानगरपालिका, अमरावती

मा.अतिरिक्त आयुक्त (२), महानगरपालिका, अमरावती

सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. १, महानगरपालिका, अमरावती

सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ३, महानगरपालिका, अमरावती

सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ४, महानगरपालिका, अमरावती

सहा. आयुक्त तथा वृक्ष अधिकारी, झोन क्र. ५, महानगरपालिका, अमरावती

मा.स.स.न.र., महानगरपालिका, अमरावती

मा.विद्युत विभाग, महानगरपालिका, अमरावती

मा.कार्यकारी अभियंता,सा.बां.वि.,अमरावती

श्री. मधुकर घारड, वृक्ष तज्ञ, वनराई, अमरावती

श्री. अनिल घोम, वृक्ष तज्ञ, विद्यापीठ ,अमरावती

श्री.विलास देशमुख , वृक्ष तज्ञ, अमरावती

मा.सिस्टीम मॅनेजर महानगरपालिका, अमरावती

उद्यान अधिक्षक, महानगरपालिका, अमरावती

### दि.११/०६/२०२५ रोजी झालेल्या वृक्ष प्राधिकरण समितीचा कार्यवृतांत

## झोन क्र.१

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | उपविभागीय अभियंता, सां.बां (निर्माण) उपविभाग क्र.१, अमरावती | विविध प्रजातीचे | १५ | दि.०९/०६/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एकुण १५ झाडे विविध प्रजातीची काढण्याची परवानगी मागितलेली आहे. रस्त्याच्या कडेला अमरावती ते मार्डी रोड वरील सर्व झाडे हिरवी आहे. प्राप्त प्रस्तावानुसार ज्या झाडांवर नंबर टाकलेले आहे. त्यापैकी १,२,३,४ व १५ क्रमांकाची झाडे काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी. तसचे १४ क्रमांक च्या झाडाच्या फक्त फांद्या काढण्याची परवानगी देण्यात यावी व उर्वरीत ०९ झाडे जी प्रत्यक्ष स्मारकाच्या रस्त्यामध्ये येत आहे. त्या ०९ झाडांना **<u>नियमानुसार ९X६००० = ५४,०००/- म.न.पा. खाती जमा करून झाडे काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही,</u>** असे | **स्मारकाच्या रस्त्यामध्ये येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०९ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | | |
| २. | श्री.उमाकांत मनमत बिरासदार, लक्ष्मी नगर, शोभा नगर, अमरावती | कडूबदाम | ०१ | दि.०९/०६/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता सदर कडुबदाम **झाडाच्या फांद्या ज्या Electric तारात गेलेल्या आहे. त्या MSEB च्या साहाय्याने उद्यान विभागद्वारे काढण्यास परवानगी देण्यास हरकत** नाही, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **विद्युत तारामध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारामध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३. | श्री. अमृतलाल छोटेलाल यादव, राधा नगर, मोर्शी रोड, गुरूदेव मंगल कार्यालय, अम. | पिंपळ | ०१ | दि.०९/०६/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता पिंपळाचे मोठे झाड अर्जदाराचे आवारात आहे. **झाडांच्या Electric तारात गेलेल्या फांद्या MSEB च्या सहाय्याने उद्यान विभागाद्वारे काढण्यात याव्या.** झाडांची अत्यंत जास्त प्रमाणात छाटणी करू नये, असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **विद्युत तारामध्ये गेलेल्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारामध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४. | श्री. साहेबराव उत्तमराव मेंढे, लक्ष्मी नगर, गजानन महाराज मंदीर समोर, अमरावती | सु-बाभुळ | ०१ | दि.०९/०६/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता दोन घराच्या मध्यात सर्व्हिस गल्ली मध्ये सु-बाभुळचे एक मोठे वाळलेले झाड आहे. ते केव्हाही कोसळू शकते. त्यामुळे सदर **वाळलेले झाड उद्यान विभागाद्वारे काढण्यात यावे,** असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५. | श्री. श्रीराम अमृतलाल छबलानी, सहकार नगर, अमरावती | सप्तपर्णी | ०३ | दि.०९/०६/२०२५ रोजी मा.तांत्रिक सदस्य यांचे समवेत प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता तिनही सप्तपर्णी ची झाडे ही रस्त्याचे कडेला सार्वजनिक ठिकाणी आहे. झाडे हिरवीगार आहे. त्यामुळे तिनही **झाडे तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी,** वृक्षाला इजा पोहचू नये असे सूचित करण्यात यावे.असे तांत्रिक सदस्य यांचे मत आहे. सबब निर्णयार्थ सादर. | **वृक्ष हिरवेगार असल्याने तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ६. | श्री. संदीप ना. नावंदर, अंबापेठ, अमरावती | आडजात | ०१ | दि.१५/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले असता एक आडजात वृक्ष विनापरवानगी छाटल्याचे निदर्शनास आले. करीता संबंधीत अर्जदारास **विनापरवानगी वृक्ष तोडणेबाबत नोटीस देण्यात आली.** सबब निर्णयार्थ सादर. | **सदर स्थळाचे तांत्रिक सदस्य यांचे सोबत फेर निरीक्षण करावे.** | **सदर प्रकरणी पुन्हा तांत्रिक सदस्य यांचे सोबत पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |
| ७. | श्री.गणेश दादाराव अनासाने, दहीसाथ | विविध प्रजाती | १०/१२ | मागील वृक्ष प्राधिकरण सभा दि. १३/०५/२०२५ ठराव क्र. १० अन्वये सदर प्रस्ताव मांडण्यात आला होता. सभेमध्ये अर्जदारास १,००,०००/- रू. दंड सर्वानूमते मंजुर करण्यात आला असुन सदर सभेचा कार्यवृत्तांत | **दंड वसुल करण्यात यावा.** | **मागील सभेत ठरल्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | चौक, भाजीबाजार, अमरावती यांची दि.११/१२/२०२४ रोजीची ऑनलाईन तक्रार | | | अद्यापपावेतो कार्यालयाला अप्राप्त असल्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य झाले नाही. सबब निर्णयार्थ सादर. | | **करण्यात यावी.** |
| ८ | भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण ग्रिनलँड बिझनेस पार्क, बोरगांव धर्माळे,अमरावती | विविध प्रजाती | ११९ वृक्ष | सविनय फेर सादर करण्यात येते की, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधीकरण यांना झाड तोडण्याची परवानगी करीता अनामत रक्कम भरणा बाबत. कार्यालयात मार्फत पत्र देण्यात आले आहे. त्याअनुषंगाने त्यांनी ९८ वृक्ष परवानगी करीता ५,४०,०००/- रू.चा भरणा मनपा फंडात केला आहे. तसेच त्यांनी झाडे तोडण्याची परवानगी मिळणेबाबतृचे पत्र त्यांनी कार्यालयाला दिले आहे. परंतू मागील वृक्ष प्राधिकरण सभा दि. १३/०५/२०२५ ठराव क्र. ११ अन्वये त्यांना ३० वृक्ष विनापरवानगी तोड केल्याबाबत प्राधिकरणाने दंड ठोठावण्यात आला होता. सदर सभेचा कार्यवृत्तांत अद्यापपावेतो कार्यालयाला अप्राप्त असल्यामुळे पुढील कार्यवाही करणे शक्य झाले नाही. सबब निर्णयार्थ सादर. | **दंड वसुल करण्यात यावा.** | **मागील सभेत ठरल्याप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करण्यात यावी.** |

# झोन क्र.२

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्रीमती भारती ह. मेश्राम हमालपुरा अम | करंज वृक्ष | १ | दिनांक २७/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. करंज वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. कोणतीही अडचण दिसुन येत नाही. वृक्ष / फांदया तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इंजा पोहचवु नये असे सुचित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर | **वृक्ष हिरवेगार असल्याने तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| २ | श्री शिरीष पांडुरंग मुळे पन्नालाल नगर अम | उंबर वृक्ष | १ | दिनांक २७/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. उंबर वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्षाच्या फांदया पुर्वीच काढण्यात आल्याचे दिसुन आले. तथापी किडलेली एक फांदी विद्युत तारेकडे झुकलेली फांदी उद्यान विभागाने काढण्याची कार्यवाही करावी. उद्यान विभाग यांना फांदी काढण्याची परवानगी कारवाई करीता देण्यात आली आहे. जा.क्र १५४ दि.२८/ ०५/२०२५ कार्योत्तर मंजुरीस सादर. | **वृक्षाची किडलेली फांदी काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाची किडलेली फांदी काढण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३. | श्री श्रीराम पंत उ. मनगटे अंबापेठ | सप्तपर्णी वृक्ष वाळलेले | १ | दिनांक २७/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. एक सप्तपर्णी वृक्ष वाळलेले सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला सप्तपर्णी वृक्ष पुर्णपणे वाळलेला असुन तात्काळ काढण्याची कार्यवाही उद्यान विभागाने करावी. नियमाप्रमाणे पर्यायी वृक्ष लागवडीची प्रपत्रात नोंद घ्यावी. उद्यान विभाग यांना वाळलेले वृक्ष काढण्याची परवानगी कारवाई करीता देण्यात आली आहे. जा.क्र १५३ दि.२८/ ०५/२०२५ कार्योत्तर मंजुरीस सादर. | **वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करण्यास कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| ४. | श्री. भिमराव देवराव मनोहरे अशोक नगर | पिंपळ उंबर रामफळ | १<br>१<br>१ | दिनांक ०२/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराला घरकुल बांधकाम मंजुर असल्याचे सांगण्यात आले. मंजुरी पत्र सोबत जोडण्यात यावे. त्यानंतर नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. दि. ०८/०५/२०२५ रोजीचे रमाई आवास योजनेचे घरकुलाचा लाभ दिल्याबाबत पत्र या कार्यालयास दि. २९/०५/२०२५ रोजी प्राप्त करुन देण्यात आले आहे. उचित निर्णयास सादर | **बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०३ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५. | श्री. नितेश विनोद खंडेलवाल खापर्डे वाडा, राजकमल चौक अम | कडुनिंब पांजरा उंबर | १<br>१<br>१ | अवैध वृक्षाच्या फांदया तोडल्याप्रकरणी तक्रार प्राप्त झाली त्यानुसार दि. १३/०५/२०२५ रोजी वृक्ष प्राधिकरण सभा मध्ये प्रकरण ठेवण्यात आले. त्यानुसार पुन्हा पाहणी करुन अहवाल सादर करावा.<br>दिनांक २७/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला.श्री खंडेलवाल यांचे मालकीच्या सदर जागेतील जुन्या ईमारतीचे पाडकाम पुर्ण झाले असुन सदर जागेवर एक कडुनिंब एक पांजरा एक उंबर वृक्ष अशी एकुण तीन जुनी मोठी वृक्ष आहेत पांजरा व कडुनिंब वृक्षाच्या फांदया वादळाने पडल्याचे आढळुन आले अवैध वृक्षतोड झालेली नाही. सबब गैरअर्जदाराचा श्री खंडेलवाल यांचा खुलासा मान्य करण्यास हरकत नाही. प्रकरण नस्ती करण्यात यावे. श्री खंडेलवाल यांना वृक्ष तोडावयाचे असल्यास नियमाप्रमाणे अर्ज करण्याच्या सुचना व अर्ज देण्यात आले. उचित निर्णयास सादर | **प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली असून वृक्षाच्या फांदया वादळाने पडल्याचे आढळुन आले आहे.** | **सदर प्रकरण नस्ती बंद करण्यात यावे.** |
| ६. | सौ. सुवर्णा अमित कु-हेकर सबनिस प्लॉट अम | काशिद वृक्ष फांदया | ३ | दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे घरासमोर सार्वजनिक रस्त्याचे कडेला तिन काशिद वृक्ष अस्ताव्यस्त वाढलेली असुन वृक्षाच्या फांदया पडतात असे दिसुन आले. अस्ताव्यस्त वाढलेल्या ३-४ इंच व्यासाच्या फांदया मनपा उद्यान विभागाने काढण्याची कार्यवाही करावी. म्हणजे अर्जदाराला होणारा त्रास कमी होईल. फांदया काढण्यास हरकत नाही. उचित निर्णयास सादर . | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या ३ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७. | सौ. उषा अरविंद लोदे नरहरी नगर अमरावती | भिंगरी वृक्ष | १ | दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. भिंगरी वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्ष दोन भागात विभागला | **वृक्षाच्या फांद्या** | **वृक्षाच्या ६० ते ७० सेमी पेक्षा** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | असल्याने श्री शेरेकर यांचे घराकडे झुकलेला फांदा ( ६० सेमी पेक्षा जास्त जाडीचा काढण्यात याव्यात तसेच लोंदे यांचे घराकडील ७० सेमी व्यास असलेल्या फांदया उद्यान विभागाने काढण्यात हरकत नाही. फांदया काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही. यांची दक्षता घेण्यात यावी. उचित निर्णयास सादर . | **काढण्यास हरकत नाही.** | **जास्त जाडीचा व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८. | वैशाली नंदकुमार बुंदेले कल्याण अपार्टमेंट गोविंद नगर अम | पिंपळ वृक्ष कडुनिंब वृक्षाचे खोड | १<br>१ | दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. कल्याण अपार्टमेंट मधिल आवारात पिंपळ वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. पिंपळ वृक्षा लगत कडुनिंब खोड अडकले असल्याने कंपाऊड भिंत क्रॅक झाली आहेत. सबब वृक्षाला लागुन असलेले कडुनिंबाचे खोड काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. तसेच पिंपळ वृक्षाचे बुडाजवळ केलेले क्रॉक्रीट काढण्याच्या सुचना अर्जदारास देण्यात याव्यात पिंपळ वृक्षाला इजा पोहचवु नये असे सुचित करण्यात आले. उचित निर्णयास सादर . | **कडूनिंब झाडाचे खोड काढण्यास हरकत नाही.** | **कडूनिंब वृक्षाचे खोड काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. तसेच पिंपळ वृक्षाचे बुडाजवळ केलेले क्रॉक्रीट काढण्याच्या सुचना अर्जदारास देण्यात याव्या.** |
| ९. | श्री आदित्य अ. धनवटे बेलपुरा अमरावती | रामफळ वृक्ष | १ | दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. अर्जदाराचे घराचे बांधकाम सुरु असल्याचे दिसुन आले. घराच्या आवारात रामफळ वृक्षछान वाढलेला व हिरवागार आहे. अर्जदाराने बांधकाम परवानगी जोडलेली दिसुन येत नाही. बांधकाम परवानगी अथवा घरकुल असल्यास घरकुल मंजुरीचे पत्र सादर करण्याच्या सुचना देण्यात याव्यात तोपर्यंत वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा पोहचवु नये असे सुचित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर | **बांधकाम परवानगी सादर नसल्याने वृक्ष तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. वृक्षाला इजा पोहचवु नये असे सुचित करण्यात यावे.** |
| १०. | श्रीआर.एस. तायडे राजकमल चौक | बदाम वृक्ष बकुळ वृक्ष | १<br>१ | दिनांक ०६/०६/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले. खालील प्रमाणे अहवाल प्राप्त झाला. जाहिरात कंपनीचा फलक जमिनीपासुन ब-याच उंचीवर इमारतीला लागुन आहे. बकुळ, बदाम वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याचे कडेला छान वाढलेली व हिरवेगार आहेत. जाहिरात दिसण्यास कोणतीही अडचण नाही. सबब फांदया तोडण्याची,वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इंजा पोहचवु नये असे अर्जदारास सुचित करण्यात यावे. उचित निर्णयास सादर | **जाहिरात दिसण्यास कोणतीही अडचण नसल्याने तोडण्याची परवानगी देता येणार नाही.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. वृक्षाला इजा पोहचवु नये असे सुचित करण्यात यावे.** |

# झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | मा.कार्यकारी अभियंता म.जी.प्रा.जल व्यवस्थापन क्र.३अम. | विविध वृक्ष | ६४ | दि. २९/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.त्यावेळी म.जी.प्रा.चे मा.कार्यकारी अभियंता श्री.लेवरकर व श्री वाकेकर तसेच कंत्राटदार उपस्थित होते.अमरावती शहराला बडनेरा व इतर बगळा वाढीव पाणी पुरवठा करण्यासाठी मौजा बेनोडा भागातील शासकीय टेकडीवजा जमिनीवर ७०मी.x३००मी.=२१००० मी.जागेवर बांधकाम करावयाचे आहे.सदर जागा म.जी.प्रा.ला हस्तांतरित करण्यात आल्याचे सांगण्यात आले.सदर जागेवर १०० पेक्षा अधिक झाडे असावीत.त्याकरिता नियोजित जागेवर झाडाची यादी पुढील नुसार अ.क्र.,वृक्ष क्र. वृक्षाचे नाव,वृक्षांची उंची,वृक्षाची जाडी,वृक्षाचे वय,काढावयाचे व ठेवायचे क्रमांक प्रमाणे देण्यात यावी.सर्व झाडावर सहा इंच x तीन इंच पिवळा पट्टा मारून त्यावर काढावयाच्या वृक्षांना लाल पेंट व राखावायाच्या वृक्षांना हिरवा पेंट ने नंबर टाकून यादी सादर करावी.असे पत्र सदर अर्जदार यांना देण्यात आले होते.वृक्षांची यादी व खालील अटींची पूर्तता केल्यानंतर वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. १)काढावयाच्या वृक्षांचे १:३ या प्रमाणे पर्यायी वृक्ष लागवड करण्यासाठी स्थळ निख्चीत करून स्थळ दर्शक नकाशा सादर करावा.<br>२)स्थानिक प्रजातीची ३-४ फुट उंचीची वृक्ष लागवड करण्याची तयारी (ट्री गार्ड –खड्डे) करण्याचे सादर करावे.<br>असे पत्र सदर अर्जदार यांना देण्यात आले होते.<br>काढावयाच्या वृक्षाचे बदली लागवडीची हमी म्हणून प्रतीवृक्ष (काढण्यात येणाऱ्या)१x३x२०००=६००० याप्रमाणे ठेव वृक्ष प्राधिकरण कडे ठेवण्यात यावी.<br>वरील बाबींची पूर्तता अर्जदार यांनी खालील प्रमाणे केली आहे.<br>(१)अ.क्र.,वृक्ष क्र. वृक्षाचे नाव,वृक्षांची उंची,वृक्षाची जाडी,वृक्षाचे वय,काढावयाचे क्रमांकाची यादी ६४ वृक्षाची यादी सादर केली आहे. राखावयाच्या वृक्षांची यादी सादर केली नाही.काढावयाच्या १२ वृक्षांचे फोटो सादर केले आहे.राखावयाच्या वृक्षाचे फोटो सादर केले नाही. तसेच लावण्यात येणाऱ्या वृक्षांचा त्याच जागेवरील स्थळ दर्शक नकाशा सादर केला आहे.सदर प्रकरण उचित निर्णयास्तव सादर. | **मा.तांत्रिक सदस्य यांनी सुचविल्याप्रमाणे त्रुटींची पूर्तता केली आहे परवानगी देण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ६४ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| २ | मा. शहर अभियंता म.न.पा.अमरावती. | विविध वृक्ष | ४७ | दि.०८/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.दस्तूर नगर ते छत्री तलाव रोड कडे जाणाऱ्या रस्त्याचे रुंदीकरण,कॉंक्रीटीकरण,तसेच पाईप लाईन इत्यादीचे बांधकाम करावयाचे असल्याचे सांगण्यात आले.रस्त्यात | **रस्ता बांधकामात येणारे वृक्ष** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | येणाऱ्या विविध प्रजातीच्या ४७ वृक्षाला काढण्याची आवश्यकता असल्याचे सांगण्यात आले.करिता अर्जदाराला पुढील माहिती मागविण्यात आली आहे.<br>a)अ.क्र.,वृक्ष क्र.,वृक्षाचे नाव,वृक्षाची उंची,वृक्षाची जाडी,वृक्षाचे वय,काढावयाचे-ठेवायचे वृक्षांचे क्र.<br>b)वृक्षावर सहा इंच आकाराचे पिवळया पेंट वर लाल/हिरव्या रंगाने क्रमांक टाकून फोटोसह यादी सादर करावी.<br>c)बांधकाम एजन्सी रस्ता बांधकामानंतर पर्यायी वृक्ष लागवड व देखभाल करणार असल्यास तसे नमूद करावे तसेच प्रत्यक्ष चर्चेत ठरल्याप्रमाणे रस्ता बांधकामाचा चिन्हांकित प्लान सादर करावा त्यानंतर वृक्ष काढण्याबाबत ठरविता येईल .तूर्त परवानगी नाकारण्यात यावी.<br>उपरोक्त अहवाल नुसार सबंधित अर्जदार यांना वरील बाबींची पूर्तता करण्याबाबत पत्र देण्यात आले होते.त्यानुसार त्यांनी विद्यमान झाडांची (a)नुसार यादी सादर केली आहे.(b)नुसार वृक्षांना नंबर टाकले असून वृक्षाचे सांगितल्या प्रमाणे फोटो सादर केले आहे..(c) चर्चेत ठरल्याप्रमाणे रस्ता बांधकामाचा चिन्हांकित प्लान सादर केला आहे.तसेच जुना बायपास रोड वरील हॉटेल लार्डस जवळील उषा कॉलोनी येथील म.न.पा.च्या खुल्याजागेवर १५० वृक्ष लावण्याचे नियोजन करण्याची नोटशीट सादर केली आहे.उपरोक्त प्रकरण उचित उचित निर्णयास्तव सादर. | **काढण्यास हरकत नाही.** | **लावण्याचे हमीपत्र सादर करून व ठेव स्वीकारून अटीवर ४७ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | मा.कुलसचिव संत गाडगेबाबा अम.विद्यापीठ अम. | विविध वृक्ष | ९१ | दि. २९/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.संत गाडगेबाबा विद्यापीठाला PM-USHA योजने अंतर्गत क्लासरूम इमारतीचे बांधकाम स्वताच्या जागेवर करावयाचे असून त्यासाठी स.स.न.र.विभागाने बांधकाम परवानगी दिल्याचे दिसते.सादर बांधकामाची परवानगी दिलेल्या नकाशात प्रत्यक्ष बांधकामात किती वृक्ष येतात या बाबत स.स.न.र. विभागाने वृक्ष चिन्हांकित केले नाहीत,सदर परिसरात भरपूर वृक्ष आहेत.सबब अभियंता व कंत्राटदाराने प्रत्यक्ष लेआउट टाकून कोणती व किती वृक्ष येतात याबाबत स्पष्टता करावी.त्यार्जत नमूद ९१ वृक्ष नियमानुसार काढण्याची परवानगी देण्यात हरकत नाही.काढावयाच्या वृक्षांचे बदली वृक्ष लावतांना वृक्ष लागवड परिसरात (नुकसान भरपाई वृक्ष लागवड)असा फलक लाऊन वृक्ष लागवड केल्याचा व नियमानुसार दरवर्षी वृक्ष जगात असल्याचा अहवाल सादर करावा. उचित निर्णयास्तव सादर | **बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार विशेष बाब म्हणून ठेव रक्कमेतून सुट देवून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ९१ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. काढावयाच्या वृक्षांचे बदली २७३ वृक्ष लावतांना वृक्ष लागवड परिसरात (नुकसान भरपाई वृक्ष लागवड) असा फलक लाऊन वृक्ष लागवड केल्याचा व नियमानुसार** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | **दरवर्षी वृक्ष जगात असल्याचा अहवाल सादर करावा.** |
| ४ | श्रीमती वैशाली नागदिवे रा.यशोदा नगर अम. | कडूनिंब | १ | दि. ३०/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराच्या घरासमोर सार्वजनिक जागेवर कडूनिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराच्या घराकडे झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्यवाही उद्यान विभागाने करावी. उचित निर्णयास्तव सादर | फांद्या काढण्यास हरकत नाही. | **वृक्षाच्या ३ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | श्रीमती अपर्णा डांगे रा.श्रीकृष्ण कॉलोनी अम. | | १ | दि. ३०/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराच्या घरासमोरील सार्वजनिक रस्त्यावरील विद्युत विभागाने तारेवर येणाऱ्या फांद्या काढल्याचे दिसून आले.फांद्या काढण्याच्या कार्यास कार्योत्तर परवानगी देण्यात यावी. | फांद्या काढण्यास हरकत नाही. | **वृक्षाच्या ३ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्रीमती प्रमिला मेंढे रा.फ्रेजरपुरा | पिंपळ | १ | दि. २९/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली आहे.पिंपळ वृक्ष नझुल जागेवर छान वाढलेला व हिरवागार आहे.वृक्षाचा विस्तार बराच मोठा आहे.अर्जदार महिलेला कच्च्या घराचे पक्के बांधकाम करण्यासाठी घरकुल योजनेतून मंजुरी मिळाल्याचे दिसते.सबब वृक्ष बांधकामात येत नाही तथापी फांद्याचा विस्तार कमी करणे गरजेचे आहे.करिता फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही.वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **बांधकामात येणारे फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७ | श्रीमती कविता बहादुरे रा.राधिका नगर अम. | आंबा | १ | दि. ३०/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराच्या घरात आंबा वृक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे.विद्युत तारे कडे झुकलेली एक फांदी ५०-६० से. मी. पर्यंत असलेली काढावयाची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या ३ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ८ | श्रीमती पार्वती वाघमारे रा.आदिवासी कॉलोनी अम. | भिंगरी | १ | दि. ३०/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.शिवटेकडी उद्यान परिसराला लागून असलेल्या झोपडपट्टीत अर्जदाराचे अतिक्रमित घर आहे.त्यांच्या घराकडे म.न.पा.उद्यानातील भिंगरी वृक्षाच्या २-४ इंच व्यासाच्या घराकडे झुकलेल्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ९ | श्री विजय नागपुरे रा.संत रोहिदास कॉलोनी.अम. | वाळलेले वृक्ष | १ | अर्जदार यांच्या घरासमोरील एक वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात आली आहे.कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी. | वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही. | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | श्री.देवीसिंग ह. डाबेराव उप-सचिव राज्य माहिती आयोग अमरावती. | सुबाभूळ | २ | सदर प्रकरणात मागील वृक्ष प्राधिकरण सभा १२/०३/२५ रोजीच्या सभेतील ठराव क्र.०३ नुसार २ सुबाभूळ वृक्षाच्या २ते४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यात आली होती.त्यावर राज्य माहिती आयोगाने दि.१४/०५/२५ रोजी पुन्हा पत्र दिले असून त्यामध्ये त्यांनी झाड कच्चे असून केव्हाही पडू शकतात त्यामुळे मा.राज्य माहिती आयुक्त यांच्या दालनाचे नुकसान होऊ शकते.तसेच वृक्षामुळे भिंतीला तडे गेले आहे.याबाबत भविष्यात मा.राज्य माहिती आयोगाच्या दालनाचे काही नुकसान झाल्यास याची सर्व जबाबदारी आपली राहील असे पत्राद्वारे कळवून २ झाड तोडण्याची परवानगी देऊन सदर झाडे तोडून देण्याची पुनश्च: विनंती केली आहे. | **वृक्ष सा.बां.वि. यांचे अखत्यारीत असल्याने त्यांचे सहकार्य घेऊन वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **२ सुबाभूळ वृक्ष अर्जाराच्या इमारतीवर झुकलेले असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ११ | श्रीमती पंचशीला वानखडे रा.यशोदा नगर अम. | कडूनिंब | १ | दि. ३०/०५/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.अर्जदाराला खुल्या प्लॉटवर बांधकाम करावयाचे असून बांधकाम विभागाने परवानगी दिल्याचे दिसते.तथापी कडूनिंब वृक्ष प्लॉटच्या अगदी कार्नरला व रस्त्याच्या बाजूला आहे.वृक्ष बांधकामात येतो किंवा कसे ? याबाबतचा बांधकाम अभियंत्याचा अहवाल घ्यावा.जेणेकरून वृक्ष काढण्याबाबतचा विचार करता येईल.त्यानुसार बांधकाम विभागाला पत्र दिले असून अहवाल अप्राप्त आहे. तूर्त परवानगी नाकारण्यात यावी.उचित निर्णयास्तव सादर. | **बांधकाम विभागाचा अहवाल प्राप्त झाला आहे.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०१ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १२ | श्री.रणजीत साबळे रा.किरण नगर न.२ अम. | वाळलेले वृक्ष | १ | अर्जदार यांच्या घराबाजुला सार्वजनिक रस्त्यावरील एक वाळलेला वृक्ष तोडण्याची परवानगी पत्र उद्यान विभागाला देण्यात आले आहे.कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी. | **वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| १३ | श्री.मधुकर बरडे रा.त्रिवेणी कॉलोनी अम. | वड | १ | दि.६/६/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली.वड वृक्ष हनुमान मंदिर परिसरात छान वाढलेला व हिरवागार आहे.अर्जदाराचे घर वृक्षापासून बरेच अंतरावर आहे.श्री.जुनघरे यांनी अर्जदारासोबत संपर्क केला असता संपर्क होऊ शकला नाही.सबब वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी. वृक्षाला इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी.असे सूचित करावे. | **वड वृक्ष हनुमान मंदिर परिसरात छान वाढलेला व हिरवागार आहे.** | **वृक्ष हिरवेगार असल्याने वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| १४ | श्री.मिलिंद खोब्रागडे रा.यशोदा नगर अम. | कडूबदाम | १ | दि.६/६/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.कडूबदाम वृक्ष छान वाढलेला हिरवागार आहे.वृक्षाच्या विद्युत तारांवर गेलेल्या व घरावंर आलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभाग मार्फत तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या उद्यान विभागामार्फत काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १५ | श्री.दिनेश वाघ रा.वनश्री कॉलोनी अम. | सागवान | २. | सदर प्रकरण दि.२१/०१/२५ रोजीच्या सभेत ठेवण्यात आले होते.ठराव क्र.११ नुसार बांधकाम परवानगी सादर केल्यानंतर परवानगी देण्यास हरकत नाही असे मा.तांत्रिक सदस्य यांच्या अह्वालनुसार व ठराव नुसार | **परिपक्व सागवान वृक्ष काढण्यास** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे वृक्ष** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सदर अर्जदार यांना २ सागवान वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात आली होती.त्यावर सदर अर्जदार यांनी पत्र दिले असून त्यामध्ये त्यांनी आम्हाला सदर जागेवर कोठलेही बांधकाम करावयाचे नसल्याने आम्ही म.न.पा.बांधकाम परवानगी काढली नाही. आमच्या गावातील घराचे दुरुस्तीचे काम चालू आहे व त्या करिता लाकडाची गरज आहे करिता आम्हाला सागवान वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यात यावी.असे म्हटले आहे.आपल्या उचित निर्णयास्तव सादर. | **हरकत नाही.** | **लावण्याचे अटीवर २ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| १६ | श्री.भानुदास रामचंद्र टवलारे रा.अमर कॉलोनी अम. | कडूनिंब | १ | दि.४/६/२५ रोजी प्रत्यक्ष पाहणी केली.आंबा वृक्ष छान वाढलेला हिरवागार आहे.वृक्षाच्या घराकडे झुकलेल्या २-४ इंच व्यासाच्या फांद्या तोडण्याची परवानगी देण्यात आली असून कृपया कार्योत्तर परवानगी देण्यात यावी. उचित निर्णयास्तव सादर. | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **विद्युत तारेमध्ये गेलेल्या वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्याची कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.** |
| १७ | श्री.निखील अरुण तिडके रा.उषा कॉलोनी | आंबा | १ | दि.०९/०६/२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले.सदर आंबा वृक्ष १० वर्ष वयाचा असून छान हिरवागार वाढलेला आहे.परंतु वृक्ष किचनला लागून असल्यामुळे त्याचे प्रेशर भिंतीवर येत आहे.बांधकाम जुने असल्याने भिंत पडण्याची शक्यता आहे.तसेच झाडाच्या मुळा आवारातील सेप्टिक टॅंक ला भेगा पडल्या आहेत.करिता मनपा च्या अटी शर्थी नुसार सदर आंबा वृक्ष तोडण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. | **घराच्या भिंतीला झाडामुळे प्रेशर येत असल्याने वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर १ आंबा वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

# झोन क्र.४

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | श्री वीरेंद्र बी. लढ्ढा, अध्यक्ष औद्योगिक वसाहत सहकारी संस्था सातुर्णा अमरावती | कडूनिंब १ पिंपळ १ आकाशनिंब १ | ३ | दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले. **तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-** औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेच्या जागेवर अतिक्रमण करण्यात आले होते ते अतिक्रमण मनपा अतिक्रमण विभागाने काढले असून प्रस्तावीत रस्ता मोकळा करण्यात आला आहे. सदर रस्त्यामध्ये 3 वृक्ष येतात संस्थेचा रस्ता बांधकाम सह मंजूर असल्याचे दिसून आले. अतिक्रमणामुळे रस्त्याच्या बांधकाम होऊ शकले नव्हते सबब 1x3 या प्रमाणे 9 वृक्षांची ठेव स्वीकारून वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. वसाहतीमध्ये अधिकचे वृक्ष लावण्याचे संस्थेला सुचविण्यात यावे. **अहवालानूसार 3 वृक्ष काढण्याची परवानगी मंजुरी करिता सादर.** | **बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०३ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| २ | श्रीमती आशा कृष्णराव बोधले, साई नगर , अमरावती | वाळलेला कडूनिंब | 1 | दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-.** वाळलेला कडूनिंब वृक्ष रस्त्याच्या कडेला आहे सार्वजनिक जागेवर असल्याने वृक्ष त्वरित काढण्याची कार्यवाही उद्यान विभागाने करावी.<br>**अहवालानुसार वाळलेला वृक्ष काढणाच्या मंजुरीकरिता सादर** | **वृक्ष वाळलेला असल्याने परवानगी देण्यास हरकत नाही.** | **वृक्ष वाळलेला असल्याने वृक्ष काढण्याची कार्यवाही उद्यान विभागामार्फत करण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ३ | श्री गजानन महादेवराव ढोले , सीताराम बाबा नगर अकोली | सागवान | 3 | दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-.** अर्जदाराकडे ५ साग वृक्ष व 1 पाम वृक्ष आहे अर्जदाराला 3 साग वृक्ष परिपक्व झालेले ६० से.मी. पेक्षा अधिक जाडीचे काढावयाचे आहे साग विषयक धोरणाधीन राहून 1x1 याप्रमाणे वृक्ष काढण्याची परवानगी नियमानुसार देण्यास हरकत नाही.<br>**अहवालानुसार 3 सागवान वृक्ष काढणाच्या मंजुरीकरिता सादर** | **परिपक्व सागवान वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:१ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ३ सागवान वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | सौ संगीता राजेंद्र वसुले ] जुनी वस्ती बडनेरा | कडूबदाम | 1 | दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-.** बदाम वृक्ष सार्वजनिक जागेवर रस्त्याच्या कडेला छान वाढलेला व हिरवागार आहे कोणतीही अडचण दिसून येत नाही. अर्जादाराशी चर्चा करण्यात आली सदर वृक्षाच्या फांद्या अर्जदाराने पूर्वीच काढलेल्या आहेत. सबब फांद्या काढण्याची , वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात यावी वृक्षाला इजा पोहोचू नये असे सूचित करण्यात यावे. | **वृक्ष छान व हिरवागार असल्याने फांद्या काढण्यास परवानगी देता येणार नाही.** | **वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ५ | श्री बेरीस जोसेफ जॉर्ज, नवी वस्ती बडनेरा | अर्जुन | 1 | दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-.** अर्जुन वुक्ष छान वाढलेला व हिरवागार आहे. वृक्ष अर्जदाराच्या राहत्या घरी असून घराकडे झुकलेल्या 2 ते 4 इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही त्याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात.<br>**अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढणाच्या मंजुरीकरिता सादर** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ६ | श्री शद्राख नारायणराव आरख, पवन नगर नवी वस्ती बडनेरा | बाभूळ 1 उंबर 4 | 5 | दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>**तांत्रिक सदस्यांचा अहवाल :-.** अर्जदार वृक्षप्रेमी असून अर्जदाराकडे 2 आंबा वृक्षासह इतरही वृक्ष आहे. अर्जदाराचे घराला लागून ई-क्लास जमिन असून त्यावर वाढलेली काळी बाभूळ व इतर काटेरी झुडपे आहेत. अर्जदाराचे टीन असलेल्या घराकडे झुकलेल्या 2 ते 4 इंच व्यासाच्या बाभळीच्या वृक्षाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. फांद्या काढतांना वृक्षाचा तोल बिघडणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्या.<br>**अहवालानुसार वृक्षाच्या फांद्या काढणाच्या मंजुरीकरिता सादर** | **वृक्षाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या २ ते ४ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ७ | तक्रारकर्ता श्री सुभाष शंकरराव | विविध प्रजातीचे | ३ | सदर प्रकरणामध्ये प्राप्त तक्रारीनुसार सार्वजनिक रस्त्यावर असलेले 3 मोठे वृक्ष अवैधरित्या कटाई केल्याबाबत गैरअर्जदार | **प्रकरण सर्विस्तर** | **दोन्ही गैरअर्जदार** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ठाकरे राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर , बडनेरा, अमरावती | | | 1. श्री निलेश शामराव नेरकर राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर अमरावती व गैरअर्जदार 2. श्री रामेश्वर बंड, राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर अमरावती यांना या कार्यालयाचे जा.अमनपा/दप्र/सआ/२१९३/२५ दिनांक ०७/०५/२०२५ अन्वये खुलासाचे पत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार गैरअर्जदार 1. श्री निलेश शामराव नेरकर यांनी ०८/०५/२०२५ व 2. श्री रामेश्वर बंड राहणार – सुदामा कॉलोनी, साई नगर अमरावती यांनी दिनांक ०९/०५/२०२५ रोजी खुलासा या कार्यालयात सादर केलेला आहे. दोन्ही गैरअर्जदार यांनी अवैधरित्या वृक्षतोड न केल्याचे व त्यांचेवर कुठलीही कार्यवाही करण्यात येऊ नये असे प्राप्त खुलासामध्ये नमूद आहे.<br>1. आज दि. ०५/०६/२०२५रोजी प्रत्यक्ष स्थळ निरिक्षण केले.<br>2. अवैध वृक्षतोड केल्याबाबत तक्रारीचे वाचन करून निरीक्षण केले छायाचित्रे व प्रत्यक्ष स्थळावरील स्थितिचे अवलोकन केले<br>3. वृक्ष अधिकारी यांचे प्रतिनिधी श्री विशाल उसरे यांनी घटनास्थळी जाऊन लिहिलेली टिप्पणी तपासली.<br>4. मनपा कर्मचाऱ्यानी (स्वास्थ निरीक्षक) केलेल्या पंचनामाची प्रत पाहिली.<br>5. घटना स्थळी शेजारी राहणाऱ्या नागरिकांशी चर्चा केली<br>6. गैर अर्जदार 1. निलेश शामराव नेरकर 2. रामेश्वर बंड यांनी केलेला खुलासा वाचला<br>उपरोक्त सर्व बाबींचा तपशीलवार विचार करता असे निदर्शनास येते कि, तक्रारदार हे घटनास्थळीचे निवासी आहेत ते जेष्ठ नागरिक असून वृक्ष प्रेमी असल्याचे दिसून आले त्यांनी केलेली तक्रार बरोबर आहे गैरअर्जदार यांनी वृक्षाचा कचरा पडतो, झाडावे लागते, माकडे येतात, घराला धोका आहे इत्यादी गैरसमज झाल्यामुळे आपल्या घराजवळ वृक्ष नकोत म्हणून सार्वजनिक रस्त्याचे कडेला छान वाढलेली व हिरवीगार असलेली 3 मोठी वृक्ष वय अंदाजे २० वर्ष तोडून नष्ट केली असे चौकशी मध्ये समजले अजूनही या वृक्षांची काही लाकडे,कापलेली खोड दिसतात श्री बंड यांचे कंपाऊड जवळ ठेवलेली दिसून आली फोटो पाहावा.<br>तसेच गैर अर्जदार श्री बंड यांचे घरासमोर असलेला हिरवागार छान वाढलेला कडूबदाम वृक्षाला जमिनीपासून 3 ते 4 फुटाच्या अंतरावर करवा केलेला दिसून आला (खोडाला नष्ट करण्यासाठी रिंग केली, फोटो पाहावे ) तेथील शेजारी श्री बढीये व श्री पाटील व इतरांनी गैर अर्जदारानीच अवैध वृक्षतोड केल्याचे (नाव जाहीर न करण्याच्या अटीवर ) सांगितले | वाचन करण्यात आले आहे. | **यांचा खुलासा फेटाळण्यात येत असून यांना प्रत्येकी (श्री नेरकर व श्री बंड) प्रती वृक्ष २०,०००/- प्रमाणे २०००० x 3 = ६००००/- तसेच करवा करून वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे कारणास्तव प्रत्येकी रुपये ५०००/- असे एकूण ६५०००/- दंड करण्यात येत आहे. दंड न भरल्यास गैर अर्जदाराच्या मालमत्ता करामधून वसूल करण्यात यावा.** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | आहे. त्यावरून गैर अर्जदार यांनीच सार्वजनिक स्थळावरील अवैध वृक्षतोड केल्याचे सिद्ध होते.<br>त्याकरिता नागरी क्षेत्र झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे अधीन राहून दोन्ही गैर अर्जदार यांना प्रत्येकी (श्री नेरकर व श्री बंड) प्रती वृक्ष २०,०००/- प्रमाणे (वीस हजार रुपये) २०००० x 3 = ६००००/- (साठ हजार रुपये) तसेच करवा करून वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे कारणास्तव रुपये ५०००/- (पाच हजार) असे एकूण ६५०००/- (पासष्ठ हजार रुपये) दंड करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. दंड विहित मुदतीस न भरल्यास गैर अर्जदाराच्या मालमत्ता करामधून वसूल करण्यात यावा.<br>तसेच दोन्ही गैर अर्जदार यांनी सादर केलेला खुलासा अमान्य करण्यात यावा.<br>सदर अहवाल आपल्या माहितीस व उचित कार्यवाहीस सादर | | |
| ८ | तक्रारकर्ता<br>सौ.चेतना कुलकर्णी<br>स्वामी समर्थ कॉलोनी,निंभोरा खुर्द<br>बडनेरा | बुच | २ | **वृक्ष अधिकारी यांचा अहवाल :-** स्वामी समर्थ कॉलोनी न.२ निंभोरा खुर्द येथील ओपन स्पेस मध्ये असलेले २ बुच वृक्षाना जाळून नष्ट करण्याचा प्रयत्न श्री महावीर जैन यांनी केल्याबाबत ची तक्रार प्राप्त झालेली आहे त्यानुसार गैरअर्जदार श्री महावीर जैन यांना या कार्यालयाचे जा.अमनपा/द.प्र./सआ/९१४ /२०२५ दि.१३/०२/२०२५ रोजी खुलास्याची नोटीस रजिस्टर पोस्टाद्वारे दि.१४/०२/२०२५ ला पाठविण्यात आली आहे. त्यानुसार त्यांनी या कार्यालयात दि.१७/०२/२०२५ रोजी खुलासा सादर केलेला आहे.सदर खुलास्यावर मा.तांत्रिक सदस्य यांचे प्रत्यक्ष स्थळ निरीक्षन अहवाल घेण्यात आलेले आहे.<br>**तांत्रिक सदस्य यांचा अहवाल :-** दि.०७/०३/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले सार्वजनिक उद्यानामध्ये असलेल्या २ बुच (आकाश निंब ) वृक्षाना जाळण्याचा व वृक्ष नष्ट करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून आले.आगीच्या प्रभावाने वृक्ष वाळत आहेत.गैरअर्जदार यांनी दिलेल्या खुलास्याचे अवलोकन केले असता वृक्ष नष्ट करण्याचा त्यांनीच प्रयत्न केला हे स्पष्ट होते करिता सदर खुलासा अमान्य करण्यात यावा व अर्जदाराला २०००० रु.(प्रती वृक्ष १०,००० रु.प्रमाणे ) दंड करण्यात यावा दंडाची रक्कम न भरल्यास नियमानुसार (मालमत्ता कारमध्ये समाविष्ट ) वसूल करण्यात यावा.<br>उपरोक्त अहवालानुसार वृक्ष प्राधिकरण सभा दि १२/०३/२०२५ रोजीच्या ठराव क्र ८ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार तक्रारदार यांना या कार्यालयाचे जावक अमनपाक्र.१८०५ /२०२५ दि ०३/०४/२०२५ रोजीचे पत्र ओपन स्पेस मधील 2 वृक्ष जाळून नष्ट करण्याचा प्रयत्न करण्याबाबत गैर अर्जदार यांनीच वृक्ष तोड केल्याबाबतचे पुरावे सादर करण्याबाबत कळविले होते. त्यानुसार तक्रारदार यांनी दि ०८/०४/२०२५ रोजी त्यांचे उत्तर सादर केलेले आहे. सदर उत्तरामध्ये त्यांनी प्रत्यक्ष स्वतः बघितल्याबाबत असून प्रत्यक्ष सादर करता यावा असा कुठलाही पुरावा नाही असे नमूद आहे.<br>अहवलानुसार उचित कार्यवाहीस सविनय सादर | **फेर पाहणी करण्यात यावी.** | **तांत्रिक सदस्य यांचे सोबत प्रत्यक्ष फेर पाहणी करून प्रकरण पुढील सभेत ठेवण्यात यावे.** |

# झोन क्र.५

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | रवींद्र वासुदेवराव गुल्हाने रा. म्हाडा कॉलनी अमरावती | जाबुळ वृक्ष | ०१ | दिनांक २६/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण असता असता एक जांबूळ वृक्ष सार्वजनिक रस्त्यावर ट्री गार्डमध्ये छान वाढललेले व हिरवेगार आहे. वृक्षाला कोणतीही अडचण दिसून येत नाही अर्जदाराने बांधकाम परवानगी वृक्ष तोड अर्जासोबत जोडलेली नाही. बांधकाम परवानगी बावत विचारणा करून सादर करायचे सुचविण्यात यावे वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. | **बांधकाम परवानगी सादर करण्यात यावी.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| २ | श्री. राम विंचूरकर भाजीबाजार भिवापूरकर वाडा भाजीबाजार अमरावती. | कडू निंब वृक्ष | ०१ | दिनांक २६/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले असता एक कडूनिंब वृक्ष अर्जदाराच्या शेजारी राहणाऱ्या श्री.सोनी यांच्या मालकीच्या आवारात असून वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहे.श्री.सोनी यांचे घर बंद आढळून आले त्यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. | **वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे.** |
| ३ | श्री.यामिर खान नामीर खान रा. तालाबपुरा, अमरावती. | कडू निंब वृक्ष | ०१ | दिनांक २६/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले असता एक कडू निंब वृक्ष अर्जदाराच्या राहत्या घरात असुन कडूनिंब वृक्ष छान वाढलेला व हिरवेगार आहे. वृक्ष घराच्या आत असुन वृक्षाचा डेरा वाढलेला आहे व खोड निमुळते झाले आहे. वादळात वृक्ष हानी पोचवू शकते. नियमानुसार वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. | **वृक्ष काढण्यास हरकत नाही.** | **नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०१ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे.** |
| ४ | श्री. पंकज घनश्याम वडूरकर रा. म्हाडा कॉलनी अमरावती | कडू निंब वृक्ष | ०१ | दिनांक १४/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण असता एक कडूनिंब वृक्ष अर्जदाराच्या घरात मागील सर्विस गल्ली मध्ये असुन कडू निंब वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहे. अर्जदाराच्या घरावर झुकलेल्या ४-६ व्यासाच्या फांद्या काढण्याची परवानगी देण्यात हरकत नसावी. | **घरावर झुकलेल्या ४-६ व्यासाच्या फांद्या काढण्यास हरकत नाही.** | **वृक्षाच्या ४ ते ६ इंच व्यासाच्या फांद्या काढण्यास परवानगी देण्यात येत आहे.** |
| ५ | सौ. पुष्पा विनोद शिरभाते रा.छाया कॉलनी, आकोली रोड अमरावती | कडू बदाम वृक्ष | ०१ | दिनांक १४/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण केले असता एक कडू बदाम वृक्ष अर्जदाराच्या घरासमोर छान वाढलेले व हिरवेगार आहे. वृक्षाच्या फांद्या अर्जदाराने आगोदर काढल्या असल्याचे दिसून आले. अर्जदाराला वृक्षाच्या बाजूचे कॉंक्रीट काढण्याचे सुचविण्यात यावे व वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात यावी.बांधकाम परवानगी सादर करण्याच्या | **वृक्ष घरासमोर छान वाढलेले व हिरवेगार आहे.** | **वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. वृक्षाच्या बाजूचे कॉंक्रीट काढण्याचे सुचविण्यात** |

मा. अतिरिक्त आयुक्त यांचे स्वाक्षरी

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | सूचना देण्यात याव्या. | | य |
| ६ | सौ. पुष्पा केशवराव उजवणे ग. म्हाडा कॉलनी अमरावती | सागवान वृक्ष | ०२ | दिनांक १४/०५/२०२५ रोजी मा. तांत्रीक सदस्य यांनी स्थळ निरिक्षण असता दोन सागवान वृक्ष अर्जदाराच्या खाली प्लॉट मध्ये आहे त्या प्लॉट मध्ये दोन सागवान वृक्ष छान वाढलेले व हिरवेगार आहेत. अर्जदाराला बांधकाम करावयाचे आहे. असे दिसून आले तथापि ससनर विभागाकडून बांधकाम घ्यावयाची परवानगी अर्जदाराने वृक्ष तोड अर्जासोबत जोडलेली नाही. सबब बांधकाम परवानगी घेतल्यानंतर वृक्ष काढण्याबाबत विचार करता येईल.वृक्ष तोडण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. | बांधकाम परवानगी सादर करण्यात यावी. | वृक्ष काढण्याची परवानगी नाकारण्यात येत आहे. |

## वेळेवरील विषय झोन क्र.३

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | वृक्षाचे वर्णन | झाडांची संख्या | तांत्रिक सदस्य व वृक्ष अधिकारी यांचा अहवाल | चर्चा | वृक्ष प्राधिकरण समितीचा निर्णय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | श्री. प्रमोद इंगोले उप अभियंता अमरावती महानगर पालिका अम. | विविध वृक्ष | १८ | A) दि.१२/०५/२०२५ रोजी प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण केले. फरशी स्टाप ते दस्तूर नगर रोडच्या डाव्या बाजूला नाली बांधकाम सुरु असल्याचे दिसून आले. या संपूर्ण रोड वर किती वृक्ष आहेत या बाबतची यादी (दि.२३/१/२५ रोजीच्या पत्रानुसार) सोबत लावलेली दिसून येत नाही. प्रत्यक्ष १२ वृक्षाचे फोटो जोडलेले आहे व फॉर्म ८ मध्ये एकूण १८ वृक्ष असल्याचे नमूद आहे. सबब उपरोक्त रोड बाजूला किती व कोणत्या प्रजातीची वृक्ष आहेत याची यादी जोडावी.<br>B) पाहणीत प्रत्यक्ष नाली बांधकामात १) अशोका २) आकाशनीम, ३) इग्रजी चिंच, ४) 3 गुलमोह वृक्ष असे एकूण ६ वृक्ष नाली बांधकामात येत असल्याचे दिसून आले. खालील अटीची पूर्तता केल्यानंतर उपरोक्त सहा वृक्ष काढण्याची परवानगी देण्यास हरकत नाही. प्रत्यक्ष बांधकामात येणाऱ्या अडचणी जसे कि इलेक्ट्रिक पोल, बसस्टोप स्ट्रक्चर, इतर अतिक्रमण हटविल्यानंतर शेवटी वृक्ष काढण्यात यावी. बांधकाम अंदाज पत्रकात तरतूद पर्यायी वृक्ष लागवड करण्याबाबत संबधित कंत्राटदार यांच्या कडून अनामत ठेव व वृक्ष लागवडी बाबत स्वतंत्र बंधपत्र घ्यावे व ६X३ = १८ वृक्ष लावण्यात यावीत व याचे नियोजन करावे. उचित निर्णयास्तव सादर | वृक्ष नाली बांधकामात येणारे वृक्ष काढण्यास हरकत नाही. | नियमानुसार ठेव स्विकारून १:३ प्रमाणे वृक्ष लावण्याचे अटीवर ०६ वृक्ष काढण्याची परवानगी देण्यात येत आहे. |

अतिरिक्त आयुक्त -1
महानगरपालिका, अमरावती